E-mail - sahasangh@yahoo.in
Phone No.०२०-२६१२२६४०/२६१२९५८४

# दि महाराष्ट्र राज्य सहकारी संघ मर्यादित, पुणे

५, बी.जे.रोड, पुणे - ४११ ००१
नोंदणी क्रमांक : १९८५ दिनांक १३ जुलै १९१८

जा.क्र.प्रशासन / ५२५ /२०२१ - २२ दि.२५/११/२०२१

## -: निविदा मागविणे :-

महाराष्ट्र राज्य सहकारी संघ मर्यादित,पुणे ५, बी.जे.रोड, पुणे-४११००१ यांचे मालकी हक्काचे जागेतील इमारत क्र.३ मधील ९५० स्क्वे.फुट जागेत लाईट, पाणी उपलब्ध असलेल्या जागेतील कॅन्टीन ११ महिन्याच्या करार पध्दतीने भाडे आकाराने देणे आहे. कॅन्टीन चालविणेची वेळ सकाळी ७.०० ते सायं. ७.०० अशी राहील.

सदरील इच्छुकांनी दिनांक ३ .१२.२०२१ पर्यंत सिलबंद लखोटयात / ऑनलाईन ( Email : sahasangh@yahoo.in ) निविदेव्दारे आपणास सहभाग घेता येईल. यासाठी निविदे सोबत ईएमडी रु.१,००,०००/- चा डि.डि.महाराष्ट्र राज्य सहकारी संघ मर्यादित पुणे या नावाने सादर करावयाचा आहे. सोबत कॅन्टीन चालविणेचा परवाना, महानगरपालिकेचा परवाना, आधारकार्ड, पॅनकार्ड, जी.एस.टी. नंबर, इत्यादी कागदपत्रे निविदा फॉर्मसोबत जोडावयाची आहेत. तरी इच्छुकांनी सहभाग घ्यावा.

तसेच कोणतेही कारण न देता सदर निविदा कोणत्याही स्तरावर पुर्णतः किंवा अंशतः मंजुर अथवा नामंजुर करणेचा अधिकार **महाराष्ट्र राज्य सहकारी संघ मर्या.पुणे** यांनी राखुन ठेवला आहे.

**फ़ोन नंबर-०२०-२६१२२६४०,२६१२९५८४**

### महाराष्ट्र राज्य सहकारी संघ मर्या.पुणे उपहारगृहाच्या अटी व शर्ती

१)अटी व शर्ती नीट वाचुन घेणे-अर्धवट फॉर्म ग्राहय धरला जाणार नाही.

२)चेक लिस्ट - उपहारगृह चालविण्याचा शॉप ॲक्ट लायसन्स ,महानगरपालिकेचा परवाना, आधारकार्ड, पॅनकार्ड, जी.एस.टी. नंबर इत्यादी कागदपत्रे निविदा फ़ॉर्मसोबत जोडावयाची आहेत.

३)सदर कराराची मुदत करार झालेल्या दिनांकापासून ११ महिन्यापर्यंत राहील.

४)उपहार वापरामध्ये होणा-या संभाव्य नुकसानीपोटी रक्कम र.१,००,०००/-(अक्षरी-रु.एक लाख फक्त)सिक्युरिटी डिपॉझिट म्हणून प्रथम भरणा करावी.ती रक्कम १ वर्ष वर्ष मुदतीकरीता बिनव्याजी राहील.

५) उपहारगृहातील कामगार हे आपले असतील त्यांचे पगार देणे याबाबत सर्वस्वी जबाबदारी उपहारगृह चालकाची राहील.

६) संघाच्या आवारात खादयपदार्थ इतरत्र टाकण्यास सक्त मनाई राहील. उपहारगृहात स्वच्छता ठेवावी लागेल.

७) उपहारगृहातील व परिसरातील कच-याची विल्हेवाट उपहारगृह चालकाने करावयाची आहे. व उपहारगृह स्वच्छ ठेवावयाचे आहे.

८) उपहारगृहातील अंतर्गत इलेक्ट्रीक व मेन्टेनन्स हा उपहारगृह चालकाने स्वखर्चाने करावयाचा आहे.

९) उपहारगृहात पुरविण्यात येणा-या खादयपदार्थामुळे कोणत्याही प्रकारची विषबाधा अगर त्रास झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी उपहारगृह चालकावर राहील.

१०) उपहारगृह चालविण्या करीता आवश्यक त्या शासकीय / निमशासकीय परवानगी घेण्याची संपूर्ण जबाबदारी उपहारगृह चालकावर रहील.

११) आग प्रतिबंधक सुरक्षा संबधी दक्षता घेणे व व्यवसायीक सिलेंडर वापर उपहारगृहचालक यांचेवर बंधनकारक राहील.

१२) उपहारगृहामध्ये बाल कामगार ठेवता येणार नाही. तसेच संघाच्या कार्यालयीन कामकाजानंतर कोणताही कामगार संघाच्या आवारात व उपहारगृहात राहणार नाही याची दक्षता घ्यावी.

१३) ईएमडी शिवाय प्राप्त निवीदा ग्राहय धरली जाणार नाही.

१४) केलेला करारनामा मुदतीपूर्वी संपुष्टात आणण्याचा किंवा सेवा संपुष्टात आणण्याचा अधिकार महाराष्ट्र राज्य सहकारी संघाकडे राखुन ठेवला आहे. मुदत संपल्यावर संघाची जागा खाली करुन देण्याची जबाबदारी उपहारगृह चालकाची राहील. संघाचे लेखी पत्र मिळाल्यापासून ८ दिवसाचे आत जागा खाली करुन दयावी लागेल.

१५) लाईट बील, पाणी बील व फर्निचर बील मासिक भाडे व्यतिरिक्त दयावे लागेल.

सह निबंधक सहकारी संस्था तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी